**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

## दुचाकी चोरीस गेलेल्या तक्रार देण्यासाठी आलेल्या जेष्ठ नागरिकाच्या दुचाकीचा तात्काळ शोध घेवून दुचाकी जेष्ठ नागरिकास परत

दिनांक २५/०३/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित सदाशिव पेठ पोलीस चौकी येथे म.पो.हवा. राजगुरू हया दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना एक जेष्ठ नागरीक वय ७४ वर्षे, रा. पुणे यांनी चौकीस येऊन कळविले की, त्यांनी त्यांची ॲक्टीवा मोपेड गाडी स्काऊड ग्राऊंड, सदाशिव पेठ, पुणे समोर रोडवर पार्क केली असता, ती कोणीतरी चोरुन नेली आहे. सदर तक्रारदार हे वयस्कर असल्याने ते घाबरलेल्या अवस्थेत होते. नमुद महिला पोलीस हवा. राजगुरु व फडगेट बीट मार्शलचे कर्मचारी पोलीस हवा. रोटे, पोलीस शिपाई पवार यांनी त्यांना धीर दिला.

नमुद कर्मचारी यांना सदर गाडीचा शोध घेणेबाबत चौकी सपोनि मुजावर यांनी सांगीतल्याने सदर कर्मचारी चौकीचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, महाराणा प्रताप उद्यानाजवळ, बाजीराव रोड, पुणे येथे तक्रारदार यांची ॲक्टीवा मोपेड ही चावी असलेल्या अवस्थेत त्यांना दिसुन आली. नमुद कर्मचारी यांनी सदरची गाडी ताब्यात घेऊन तक्रारदार यांना चौकीस बोलावुन घेतले असता, तक्रारदार यांनी सदरची गाडी आपली असल्याचे ओळखले. सदर गाडीस त्यांनी चावी तशीच ठेवलेबाबतची बाब त्यांचे लक्षात आली नव्हती. सदर ॲक्टीवा मोपेड ही तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

